


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

www.dainikhindusthan.com
marathe_vinod1@rediffmail.com




■ वर्ष ६९ वे/अंक ६३ वा ■ ■ अमरावती,शनिवार दिनांक २० ऑक्टोबर २०१८ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २८ आश्विन १९४० ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■

## रावण दहनासाठी जमलेल्या गर्दीला ट्रेनने चिरडले; ६० ठार

अमृतसर दि. १९ : जोदा फाटक येथील चौरा बाजार भागात रावणदहनाचा कार्यक्रम सुरू असतानाच झालेल्या भीषण रेल्वे अपघातात ६० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात आणखी किमान ५० जण जखमी असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, मृतांच्या नातेवाईकांना पंजाब सरकारने प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.



अमृतसरमधील जोदा फाटक भागामध्ये रेल्वे मार्गालगत मैदान आहे. त्या मैदानात रावणदहनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तो बघण्यासाठी शेकडो जण तेथे जमलेले होते. संध्याकाळी रावणाच्या प्रतिकृतीचे दहन झाल्यानंतर फटाके फोडण्यात आले. त्याचवेळी रुळांलगत उभे असलेले शेकडो लोक मैदानाकडे वेगाने सरकू लागले. सगळ्यांचेच डोळे रावणाच्या दहनाकडे लागलेले होते. अनेकजण त्या दहनाचे चित्रीकरण आपल्या मोबाइलमध्ये करण्यासाठी धडपडत होते. त्याचवेळी जालंदर-अमृतसर गाडी वेगाने धडधडत आली. फटाक्यांच्या आवाजामुळे लोकांना रेल्वेचा आवाजच ऐकू आला नाही आणि ही भीषण दुर्घटना घडली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवर तीव्र दु:ख व्यक्त केले असून जखमींना तातडीने मदत पुरवण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे पंतप्रधानांनी आपल्या ट्विटमध्ये नमूद केले आहे.

## दुष्काळात महाराष्ट्राला पूर्ण मदत करू; मोदींची ग्वाही

शिर्डी दि. १९ : 'महाराष्ट्रात यंदा पाऊस कमी झाला आहे. त्यामुळं दुष्काळाचं सावट आहे. राज्य सरकार त्यावर मात करण्याचा प्रयत्न करते आहेच, पण काही मदत लागलीच तर महाराष्ट्राला पूर्ण साथ देऊ. पंतप्रधान पीक विमा योजनेतून मदत करू,' असा शब्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दिला.

शिर्डी साई समाधीच्या शताब्दी सोहळ्याच्या निमित्तानं पंतप्रधान नरेंद्र मोदी आज शिर्डी दौऱ्यावर आले होते. घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना चावी वाटपासह अनेक विकासकामांचं लोकार्पण यावेळी त्यांनी केले. त्यानंतर त्यांनी उपस्थितांना संबोधित केलं. भाषणाची सुरुवात मराठीतून करताना शिर्डीत येता आल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. मोदी यांनी केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती यावेळी दिली. तसंच, राज्य सरकारच्या कामाचंही कौतुक केलं. 'दुष्काळाच्या समस्येवर मात करण्यासाठी महाराष्ट्र सरकारनं अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. जलयुक्त शिवारातून १६ हजार गावं दुष्काळमुक्त झाली आहेत. आणखी नऊ हजार गावं दुष्काळमुक्तीच्या मार्गावर आहेत,' असं *(उर्वरित पान २ वर)*


























■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६०,२६६०५७६ ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम येथे प्रसारीत ●